**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – प्रदिप किरण कुर्लेकर

माझे वय – २९ वर्षे,

व्यवसाय – स्कुबा

रा. – कोळंब, ता.मालवण

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.टी.ए. भणगे यांचे मार्फत.</u>**

०१. दि.०८/०२/२०२१ रोजी पोलिसांनी मला बोलवले नव्हते. मी मालवण जेटीवरुन जात असताना पोलिसांनी मला बोलवून घेतले व माझे नाव विचारुन सही करण्यासाठी सांगितले. माझ्या समक्ष कुठलाही पंचनामा झाला नव्हता. माझ्या समक्ष कुठलाही मुद्देमाल जप्त केला नव्हता. मला आता घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर काय लिहीलेला आहे हे मला माहीती नाही.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली त्यानुसार सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८/०२/२०२१ रोजी पोलिसांना मला धुरीवाडा येथील गारुडेश्वर मंदिर येथे बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंच म्हणून हजर राहण्यासाठी संमती दिल्यानंतर पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला होता व घटनास्थळावरुन एक जंगली लाकडी दांडा जप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने त्यांना शिक्षा होऊ नये यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

*महाराष्ट्र शासन वि. चंद्रकांत वै.*
*निशाणी क्र. ४८*

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एच.आर.गरगटे यांचे मार्फत.**

अनेकवेळा पुकारा केला असताही आरोपीचे वकील गैरहजर. आरोपींनी उलटतपास घेण्यासाठी नकार दिल्याने आरोपीविरुध्द **विना उलटतपासाचा आदेश पारित** करण्यात येतो.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

ठिकाण : मालवण
दिनांक : १२/१२/२०२३

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण